12 DEC 2024 सकाळ जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'दे आसरा' फाउंडेशनशी विद्यापीठाचा सामंजस्य करार

## स्वयंरोजगारासाठी विद्यार्थ्यांना मिळणार पाठबळ

कोल्हापूर, ता. ११ : 'शिवाजी विद्यापीठाशी झालेल्या सामंजस्य करारामुळे 'दे आसरा' फाउंडेशन आता येथील सृजनशील युवकांमध्ये उद्योजकता विकास आणि सामाजिक विकासाशी जोडली जात आहे, याचे समाधान वाटते', असे उद्योजक आणि पुण्याच्या 'दे आसरा' फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. आनंद देशपांडे यांनी आज येथे सांगितले.

सर्वसामान्य नागरिकांमध्ये उद्योजकता विकासासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणाऱ्या 'दे आसरा' फाउंडेशनसमवेत आज शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार झाला. त्यावेळी डॉ. देशपांडे बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. देशपांडे म्हणाले, 'आता नव्या पिढीने अत्यंत सजगपणाने कौशल्ये तसेच वैविध्यपूर्ण कामे करण्याकडे कल दर्शविला पाहिजे. नोकरी, रोजगाराच्या संधी येथून पुढे कमी होत जाणार असल्याने स्वयंरोजगार हाच एक महत्त्वाचा पर्याय समोर असल्याची जाणीव या पिढीने ठेवावी. आंतरविद्याशाखीय उपक्रम राबविण्याकडे विद्यापीठांनी तसेच विद्यार्थ्यांनी लक्ष पुरविले पाहिजे. त्या दृष्टीने सर्वसमावेशक उपक्रम, विद्यार्थी प्रशिक्षण आणि प्रशिक्षकांना प्रशिक्षण राबविण्यासाठी 'दे आसरा' फाउंडेशन विद्यापीठास मदत करील.' वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी सादरीकरण केले. 'दे आसरा' फाउंडेशनविषयी मुख्य कामकाज अधिकारी आशिष पंडित आणि मनीषा तपस्वी यांनी सादरीकरण केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि दे आसरा फाउंडेशन यांच्यादरम्यान सामंजस्य कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि डॉ. आनंद देशपांडे. शेजारी डावीकडून डॉ. आनंद गोडसे, मनीषा तपस्वी, आशिष पंडित, प्रमोद पाटील, व्ही. एन. शिंदे, श्रीकृष्ण महाजन, अविनाश भाले आदी.

> 'शिवाजी विद्यापीठामध्ये 'दे आसरा' फाउंडेशनचे अनेकविध उपक्रम राबविण्यासाठी पोषक वातावरण आहे. सामाजिक समावेशन केंद्रासह दोन बँकांची अध्यासने आहेत. त्यामुळे सामंजस्य करारांतर्गत विविध उपक्रम राबविण्यासाठी आवश्यक बाबींची पूर्तता करून जास्तीतजास्त विद्यार्थ्यांना उद्योजकतेविषयी अवगत करण्यासाठी प्रयत्न करता येतील. त्यातून अतिशय चांगल्या संधींची निर्मिती होईल.
>
> **-डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

12 DEC 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मूल्यांची जपणूक हीच यशाची गुरुकिल्ली

## 'पर्सिस्टंट'चे संस्थापक डॉ. आनंद देशपांडे यांचे विद्यापीठात व्याख्यान



डॉ. आनंद देशपांडे

कोल्हापूर, ता. ११ : 'व्यक्तिगत आयुष्यामध्ये मूल्यांची जपणूक हीच यशाकडे घेऊन जाणारी गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांनी आयुष्यभर ही मूल्ये जपावीत', असे आवाहन पर्सिस्टंट सिस्टीम्सचे संस्थापक आणि अध्यक्ष डॉ. आनंद देशपांडे यांनी आज येथे केले.

शिवाजी विद्यापीठाचे एमबीए युनिट, संगणकशास्त्र अधिविभाग आणि तंत्रज्ञान अधिविभाग यांच्यातर्फे डॉ. देशपांडे यांचे 'ऑपॉर्च्युनिटीज् फॉर दि इंडस्ट्रीज इन दि एज ऑफ डिसरप्टीव्ह टेक्नॉलॉजी' या विषयावर विशेष व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. देशपांडे म्हणाले, 'तंत्रज्ञानातील गतिमान बदल हे संभ्रमित करून टाकणारे असले, तरी त्यांच्या आधारेच आपल्याला आयुष्याची वाटचाल यशस्वी करायची आहे. भारत आज जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थसत्ता आहे. येत्या दशकभरात ती तिसऱ्या क्रमांकावर असेल. या लाटेवर नव्या पिढीला स्वार होऊन यश मिळवायचे असेल, तर मोठी स्वप्ने पाहायला शिकले पाहिजे. या सर्व बाबींत तुम्ही किती 'पर्सिस्टंट' राहता, सातत्य राखता, यावरही यशाची कमान अवलंबून राहते.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'विद्यार्थ्यांनी आपल्याला पुढे काय करावयाचे आहे, कोण बनावयाचे आहे, हे निश्‍चित करून आतापासूनच त्या दिशेने वाटचाल सुरू करायला हवी. आपले ध्येय जितके लवकर निश्‍चित करू, तितक्या लवकर वाटचाल सुरू करणे शक्य असते. विद्यार्थ्यांनी अधिक संवादी व्हावे.'

डॉ. श्रीकृष्ण महाजन यांनी स्वागत केले. डॉ. कविता ओझा यांनी आभार मानले.

### विद्यार्थ्यांना सांगितली पंचसूत्री

- पुढील पाच-दहा वर्षांमध्ये आपल्याला काय साध्य करावयाचे आहे, ते ठरवून वाटचाल करा.
- सध्या सारे बदल गतीने होत आहेत. त्यामुळे सातत्यपूर्ण शिक्षण-प्रशिक्षण घ्या.
- सतत नवनवीन गोष्टी शिकून त्यांच्या आधारे अधिक पुढे जा.
- नेटवर्किंग हे आयुष्यात महत्त्वाचे आहे. चांगल्या व्यक्ती, माणसे, संस्था यांच्याशी, त्यांच्या उपक्रमांशी जोडले जा.
- स्वतःची मूल्यव्यवस्था विकसित करा.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2024
लोकमत

# मूल्यांची जपणूक हीच यशाची गुरुकिल्ली : देशपांडे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** व्यक्तिगत आयुष्यामध्ये मूल्यांची जपणूक हीच यशाकडे घेऊन जाणारी गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांनी आयुष्यभर ही मूल्ये जपावीत, असे आवाहन पर्सिस्टंट सिस्टीम्सचे संस्थापक आणि चेअरमन डॉ. आनंद देशपांडे यांनी बुधवारी केले.



शिवाजी विद्यापीठाचे एमबीए युनिट, संगणकशास्त्र अधिविभाग आणि तंत्रज्ञान. अधिविभाग यांच्या वतीने डॉ. देशपांडे यांचे 'अपॉर्च्युनिटीज फॉर दि इंडस्ट्रीज इन दि एज ऑफ डिसरप्टीव्ह टेक्नॉलॉजी' या विषयावर विशेष व्याख्यान झाले. कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते, तर प्र-कुलगुरु डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. आनंद देशपांडे म्हणाले, विविध प्रकारच्या तंत्रज्ञानांनी मानवाला आता दीर्घायुष्य प्रदान केले आहे. परिणामी चांगले आयुष्य जगण्यासाठी दीर्घकाळ आपल्याला कार्यरतही राहावे लागणार आहे. तंत्रज्ञानातील गतिमान बदल हे संभ्रमित करून टाकणारे असले तरी त्यांच्या आधारेच आयुष्याची वाटचाल यशस्वी करायची आहे. पुढील पाच-दहा वर्षांमध्ये आपल्याला काय साध्य करावयाचे आहे, ते ठरवून वाटचाल करायला हवी. सध्या सारे बदल गतीने होत आहेत. त्यामुळे सातत्यपूर्ण शिक्षण-प्रशिक्षणाला पर्याय नाही. सतत नवनवीन गोष्टी शिकून त्यांच्या आधारे अधिक पुढे जायला हवे. यावेळी डॉ. श्रीकृष्ण महाजन डॉ. कविता ओझा, डॉ. सरिता ठकार, डॉ. दीपा इंगवले, डॉ. प्रवीणकुमार पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2024
पुण्यनगरी

# मूल्यांची जपणूक हीच यशाची गुरुकिल्ली

## : डॉ. आनंद देशपांडे

कोल्हापूर : प्रतिनिधी

व्यक्तिगत आयुष्यामध्ये मूल्यांची जपणूक हीच यशाकडे घेऊन जाणारी गुरुकिल्ली आहे. विद्यार्थ्यांनी आयुष्यभर ही मूल्ये जपावीत, असे आवाहन पर्सिस्टंट सिस्टीम्सचे संस्थापक आणि चेअरमन डॉ. आनंद देशपांडे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाचे एमबीए युनिट, संगणकशास्त्र अधिविभाग आणि तंत्रज्ञान अधिविभाग यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. देशपांडे यांचे 'ऑपॉर्च्युनिटीज फॉर दि इंडस्ट्रिज इन दि एज ऑफ डिसरप्टिव्ह टेक्नॉलॉजी' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. अध्यक्षस्थानी



कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. देशपांडे म्हणाले, विविध प्रकारच्या तंत्रज्ञानांनी मानवाला आता दीर्घायुष्य प्रदान केले आहे. परिणामी, चांगले आयुष्य जगण्यासाठी दीर्घकाळ कार्यरत राहावे लागणार आहे. भारत आज जगातील पाचव्या क्रमांकाची अर्थसत्ता आहे. येत्या दशकभरात ती तिसऱ्या क्रमांकावर असेल. या लाटेवर नव्या पिढीला स्वार होऊन यश मिळवायचे असेल, तर मोठी स्वप्ने पाहायला शिकले पाहिजे. त्याचप्रमाणे उपरोक्त सर्व बाबींत तुम्ही किती 'पर्सिस्टंट' राहता, सातत्य राखता, यावरही यशाची कमान अवलंबून राहते.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के अध्यक्षीय मनोगतात म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्याला पुढे काय करायचे आहे, कोण बनायचे आहे, हे निश्चित करून आतापासूनच त्या दिशेने वाटचाल सुरू करायला हवी.

प्रास्ताविक डॉ. श्रीकृष्ण महाजन, तर डॉ. कविता ओझा यांनी आभार मानले. यावेळी डॉ. सरिता ठकार, डॉ. दीपा इंगवले, डॉ. प्रवीणकुमार पाटील आदी उपस्थित होते.

12 DEC 2024
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवराज महाविद्यालयात 'जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन' स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद

प्रतिनिधी
गडहिंग्लज

शिवराज महाविद्यालय व शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन' स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. जिल्ह्यातील ३९ महाविद्यालयातून १९९ विद्यार्थी-विद्यार्थिनी सहभागी झाले होते.

अविष्कार संशोधन स्पर्धेतील विजेत्यांना शिवराज विद्या संकुलाचे अध्यक्ष प्रा. किसनराव कुराडे, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. टी. एम. चौगले, प्रा. बिनादेवी कुराडे, डॉ. आर. एच. अतिग्रे, अन्य मान्यवरांच्या हस्ते न्यू कॉलेज कोल्हापूरला जनरल चॅम्पियनशिप देऊन गौरविण्यात आले तर स्पर्धेतील अन्य विजेत्यांना बक्षिसे व प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

प्रारंभी स्वागत प्राचार्य डॉ. एस. एम. कदम यांनी केले. 'जिल्हास्तरीय अविष्कार संशोधन' स्पर्धेचे समन्वयक डॉ. डी. एच. दगडे, उपाध्यक्ष दिग्विजय कुराडे, डॉ. ए. व्ही. धुळे, डॉ. जे. बी. यादव व अन्य मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत या आविष्कार स्पर्धेचे उदघाटन संपन्न झाले.



गडहिंग्लज : न्यू कॉलेज कोल्हापूरला जनरल चॅम्पियनशिप चषक प्रदान करताना प्रा. किसनराव कुराडे, डॉ. पी. टी. गायकवाड, डॉ. टी. एम. चौगले यांच्यासह मान्यवर.

यावेळी प्रा. किसनराव कुराडे, डॉ. गायकवाड, डॉ. टी. एम. चौगले, डॉ. आर. एच. अतिग्रे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी विविध महाविद्यालयातील प्राध्यापक उपस्थित होते.

स्पर्धा समन्वयक प्रा. सुशांत पांगम, गौरव पाटील, ग्रंथपाल संदीप कुराडे, प्रा. विश्वजित कुराडे, प्रा. किशोर आदाटे, डॉ. महेश चौगुले, डॉ. एन. बी. एकीले, रजिष्ट्रार डॉ. संतोष शहापूरकर आदींनी परिश्रम घेतले. सुत्रसंचालन डॉ. अशोक मोरमारे, डॉ. श्रद्धा पाटील यांनी केले तर आभार प्रा. गौरव पाटील यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2024
पुढारी

# उद्या रात्री पाहायला मिळणार उल्का वर्षावाचा नजारा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

या वर्षातील सर्वात मोठ्या उल्कावर्षापैकी एक असलेल्या 'जमिनिड्स' उल्कावर्षाव शुक्रवार दि.१३ डिसेंबर रोजी रात्री मोठ्या प्रमाणात दिसणार आहे. या वर्षी चंद्रप्रकाशामुळे उल्कावर्षाव दिसण्यात थोडासे अडथळे असले तरीही प्रति तास सुमारे १२० उल्का दिसण्याची शक्यता आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अंतराळ संशोधन केंद्राने या खगोलीय घटनेचे निरीक्षण सर्व नागरिक, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी यांच्यासाठी रात्री ८ नंतर आयोजित केले आहे. पन्हाळा हे निरीक्षणासाठी आदर्श ठिकाण आहे. कारण येथे प्रकाश प्रदूषण कमी असून आकाश स्पष्ट दिसते. तरी सर्व नागरिक, शाळा-महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात सहभाग घ्यावा, असे आवाहन या केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2024
सकाळ

# उल्कावर्षावाचा उद्या दिसणार सुंदर नजारा

**कोल्हापूर :** यंदाचा सर्वांत मोठ्या उल्कावर्षावापैकी एक असलेल्या जेमिनिड्स उल्कावर्षाव शुक्रवारी (ता. १३ ) रात्री मोठ्या प्रमाणात दिसणार आहे. यावर्षी चंद्रप्रकाशामुळे उल्कावर्षाव दिसण्यात थोडासा प्रभाव पडत असला तरीही प्रतितास सुमारे १२० उल्का दिसण्याची शक्यता आहे. शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अंतराळ संशोधन केंद्राने या खगोलीय नजाराचे खुले निरीक्षण सर्व नागरिक, विद्यार्थी यांच्यासाठी रात्री आठनंतर आयोजित केले आहे. पन्हाळा हे निरीक्षणासाठी आदर्श ठिकाण आहे, असे आवाहन या डॉ. राजीव व्हटकर यांनी केले आहे.

12 DEC 2024
लोकसत्ता
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पन्हाळ्यावर उद्या रात्री उल्कावर्षावाचे दर्शन

**कोल्हापूर :** या वर्षातील सर्वात मोठ्या उल्कावर्षांपैकी एक असलेल्या जेमिनिड्स उल्कावर्षाव उद्या, शुक्रवारी रात्री दिसणार आहे. चंद्रप्रकाशामुळे उल्कावर्षाव दिसण्यात थोडासा प्रभाव पडत असला तरीही प्रति तास सुमारे १२० उल्का दिसण्याची शक्यता आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या पन्हाळा येथील अंतराळ संशोधन केंद्राने या खगोलीय दृश्याचे खुले निरीक्षण रात्री ८ नंतर आयोजित केले आहे. पन्हाळा हे निरीक्षणासाठी आदर्श ठिकाण आहे. येथे प्रकाश प्रदूषण कमी आहे आणि आकाश स्पष्ट दिसते. नागरिक, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी यांनी कार्यक्रमात सहभाग घ्यावा, असे आवाहन या केंद्राचे समन्वयक डॉ. राजीव व्हटकर यांनी बुधवारी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2024
पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठ व्हॉलीबॉल संघाची निवड

**मुरगूड :** कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाच्या पुरुष व्हॉलीबॉल संघाची निवड झाली असून, हा संघ १४ ते १८ डिसेंबरदरम्यान होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ व्हॉलीबॉल स्पर्धेत सहभागी होणार आहे. या स्पर्धा स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड येथे होत आहेत. शिवाजी विद्यापीठ संघातील खेळाडू असे : ओंकार लोकरे, विवेक चौगले, सत्यजित शिंदे (मंडलिक-मुरगूड), विजय खामकर, कृपेश पाटील (दूध साखर-बिद्री), अथर्व तोडकर, विजय पाटील (डीआर माने-कागल), सौरभ जगदाळे, धीरज पाटील (एस. के. पाटील -कुरुंदवाड), विश्वरूप पाटील, आदित्य सदामते (केबीपी-इस्लामपूर), अभिजित कांबळे (अण्णासाहेब डांगे-हातकणंगले), अमन नायकवडे (देवचंद कॉलेज), ऋषीकेश ठमके (विवेकानंद कॉलेज) आदी. या स्पर्धेसाठी संघाबरोबर प्रशिक्षक संदीप पाटील, सहा. प्रशिक्षक तथा व्यवस्थापक डॉ. सुनील चव्हाण जाणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
12 DEC 2024
लोकमत

# शुभमची आंतरविद्यापीठ फुटबॉल स्पर्धेसाठी निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**सेनापती कापशी :** सेनापती कापशी (ता. कागल) येथील फुटबॉल खेळाडू शुभम सुनील घोरपडे याची बडोदा येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेसाठी निवड झाली.



पन्हाळा येथील संजीवन इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये तो शिक्षण घेत आहे. नुकत्याच पार पडलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ आंतर विभागीय फुटबॉल स्पर्धेत कोल्हापूर विभागाच्या संघाकडून खेळताना त्याने अजिंक्यपद पटकावले. फुटबॉल संघामध्ये तो गोलरक्षक म्हणून खेळत आहे. निवड चाचणी स्पर्धेतदेखील त्याने चांगली कामगिरी करत विद्यापीठाच्या संघामध्ये आपले स्थान निश्चित केले आहे.